SUCCESS KEY TEST SERIES

X- Semi English

(Unit Test-4 His & Poli (Semi Ch- 8,9 &5))

इतिहास व राज्यशास्त्र -

DATE:

TIME: १ तास ३० मी

MARKS: 40

SEAT NO:

प्र.१ अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून लिहा **2**

१ जे दस्तरिवज, पूरावस्तू इत्यादी प्रदर्शित केले जात नाहीत ते ..... मध्ये जतन केले जातात.
अ. वस्तुसंग्रहालय ब. ग्रंथालय क. अभिलेखागार ड. शासकीय कार्यालय

२ ..... फ्रान्सचा सोळाव्या शतकात होऊन गेलेल्या राजा पहिला फ्रान्सिस याच्या पदरी होता.
अ. लिओनार्दो. दा. विंसी ब. मायकेल अँग्लो क. रँफेल ड. दांते

ब) पुढीलपैकी प्रत्येक गटातील चुकीची जोडी ओळखा व दुरुस्त करून पुन्हा लिहा. **2**

१ i. मार्कोपोलो - इटालियन प्रवासी - ज्याने चीनचा युरोपला परिचय करून दिला
ii. बेंजामिन ट्युडे - पहिला युरोपीय शोधक
iii. गोपाल नीलकंठ दांडेकर - माझा प्रवास
iv. इब्न बतूता - मध्ययुगाचा इतिहास

२ i. भारतीय प्राचीन ऐतिहासिक कोश - महादेवशास्त्री जोशी
ii. प्राचीन भारतीय स्थळकोश - सिद्धदेश्वरशास्त्री चित्राव
iii. क्रांतिकारांचा चरित्र कोश - एस. आर. दाते.
iv. स्वातंत्र्यसैनिक चरित्र कोश - एन. आर. पाठक.

प्र.२ अ) दिलेली संकल्पनाचित्रे पूर्ण करा.(Any One) **2**

१



२



ब) टीपा लिहा(Any One) **2**

१ संज्ञा कोश

२ सरस्वती महाल ग्रंथालय

प्र.३ अ) पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.(Any Two) **6**

१ देशामध्ये संग्रहालये आणि ग्रंथालये असली पाहिजेत.

२ संवर्धन आणि जतन यातील समाविष्ट कृती फक्त प्रशिक्षित व्यक्ती, जी पात्र आहे तीच करू शकते.

३ कोश निर्मिती शक्य तितक्या भाषांमध्ये केली पाहिजे.

ब) पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(Any Two) **6**

१ इतिहासाच्या भौतिक साधनांच्या जतन आणि संवर्धना मध्ये समाविष्ट होणाऱ्या विविध पायऱ्या कोणत्या आहेत ?

२ ग्रंथालय व्यवस्थापन का महत्त्वाचे आहे ?

३ कोशावर टीप लिहा.

प्र. ४ दिलेल्या उताऱ्याचे वाचन करून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा. **4**

> इसवी सन १९०४ साली मुंबईतील काही प्रतिष्ठित नागरिकांनी एकत्र येऊन प्रिन्स ऑफ वेल्सच्या भारत भेटीच्या सन्मानार्थ एक वस्तुसंग्रहालय उभारण्याचा निर्णय घेतला. इ. स. १९०५ च्या नोव्हेंबर महिन्यात या संग्रहालयाच्या इमारतीची पायाभरणी झाली. आणि संग्रहालयाचे नाव 'प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ऑफ वेस्टर्न इंडिया' असे निश्चित करण्यात आले. इ.स. १९९८ मध्ये या संग्रहालयाचे नाव बदलून 'छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय' असे ठेवण्यात आले.
>
> संग्रहालयाची वास्तू इंडो गोथिक शैलीत बांधलेली आहे. तिला मुंबई शहरातील पहिल्या प्रतीची सांस्कृतिक वारसा इमारत असा दर्जा देण्यात आला आहे संग्रहालयात कला, पुरातत्व आणि निसर्गाचा इतिहास अशा तीन वर्गात विभागलेल्या सुमारे पन्नास हजार पुरावस्तू संग्रहीत केलेल्या आहेत.

i. प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम ऑफ वेस्टर्न इंडिया का स्थापन करण्यात आले ?
ii. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयात काय संग्रहीत केले आहे ?
iii. विद्यार्थांनी वस्तुसंग्रहालयाला भेट दयावी असे तुम्हांला का वाटते ?

प्र. ५ पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.(Any One) **4**

१ अभिलेखागाराचे व्यवस्थापनामध्ये कोणती महत्त्वाची कामे आहेत?

२ धार्मिक पर्यटनाचे फायदे काय आहेत?

प्र. ६ दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय लिहा.(PS) **2**

१ ..... हे मूल्य समजाच्या सर्व स्तरावर नेने आवश्यक आहे.
अ. समता ब. धर्म निरपेक्षता क. सत्ता ड. आरक्षण

२ राजकीय प्रश्नांची संघटनातगति ..... घेणे आवश्यक असते.
अ. मतदान ब. परिषद क. मापन ड. निवडणूका

प्र. ७ पुढील विधाने चूक की बरोबर ते सकारण स्पष्ट करा.(PS)(Any Two) **4**

१ नक्षलवादी चळवळीमध्ये शेतकरी – आदिवासी यांच्या समस्यांचे महत्त्व वाढले.

२ बहुसंख्य समाजाचे कल्याण हे लोकशाहीचा उद् देश असतो.

३ राजकीय आणि प्रशासकीय स्तरावरील भ्रष्टचारामुळे सरकारची कार्यक्षमता वाढते.

प्र. ८ पुढील संकल्पना स्पष्ट करा.(PS)(Any One) **2**

१

२



प्र. ९ पुढील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.(PS)(Any Two) **4**

१ राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाल्यामुळे कोणते परिणाम होतात ?

२ भारतात लोकशाहीच्या यशासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत ?

३ राजकीय प्रक्रिया आधिकाधिक पारदर्शक होण्यासाठी कोणते प्रयत्न केले जातात.